## दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई.

मुख्य कार्यालय- 'पं.दीनदयाळ भवन', परळी रोड, अंबाजोगाई जि.बीड. दुरध्वनी-०२४४६-२४६९२६, २७, २८, २९

---२३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना.---

सन्माननीय सभासद बंधू व भगीनी,

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या बँकेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २२/०९/२०१९, वार रविवार रोजी, सकाळी ११.०० वा. स्व. गोपीनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे अयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सदर सभेस आवर्जुन उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**विषय पत्रिका**

१. मागील सभा दिनांक २९.०७.२०१८ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. मा. संचालक मंडळाने तयार केलेला २३ वा वार्षिक अहवाल वाचून त्यास मान्यता देणे.
३. दिनांक ३१.०३.२०१९ अखेरच्या लेखापरिक्षित ताळेबंदास व सन २०१८-१९ चे नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
४. सन २०१८-१९ या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकापेक्षा प्रत्यक्षात कमी/जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०१९-२० साठी शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६. मा. संचालक मंडळाच्या शिफारशीप्रमाणे सन २०१८-१९ सालातील नफा वाटणीस मान्यता देणे.
७. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करुन, नोंद घेणे.
८. सन २०१९-२०२० सालासाठी समावर्ती लेखापरीक्षकांची नेमणूक व मेहनताना ठरविणे.
९. सन २०१९-२०२० सालासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे.
१०. सल २०१५-२०१६ या वर्षातील अदा न झालेल्या लाभांषाची रक्कम राखिव निधीस वर्ग करणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मान्य करुन सभासदांना क्षमापित करणे.
१२. मा. अध्यक्षांचे अनुमतीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा.संचालक मंडळाच्या वतीने,

स्थळ:- अंबाजोगाई
दिनांक : २८/०८/२०१९, बुधवार

सनतकुमार बनवसकर
मुख्य कार्यकारी अधिकारी

**<u>सभासदांना नम्र सुचना.</u>**

०१. गणपुर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभेचे कामकाज नियुक्त ठिकाणीच, उपरोक्त वेळेनंतर अर्ध्यातासाने सकाळी ११.३० वा. नियोजित ठिकाणी सुरु होईल, त्यावेळी गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
०२. वार्षिक सर्वसाधारण सभेत होणाऱ्या विषयासंबधी काही सुचना/प्रश्न असल्यास मुख्यालयात दिनांक १५/०९/२०१९ पर्यंत कामकाजाच्या वेळेत दाखल करावेत. (प्रश्नकर्त्याने आपण स्वत: थकबाकीदार अथवा थकबाकीदारांचे जामिनदार नाही, तसेच शेअर्सची किमान रक्कम पूर्ण भरलेली आहे, याची खात्री करुन घ्यावी.)
०३. सभेस येतांना सदर पत्र सोबत आणावे.
०४. आपला पत्ता बदलला असल्यास, नविन पत्ता बँकेस लेखी अर्जाव्दारे पुराव्यासह दाखल करावा.
०५. आपले भाग प्रमाणपत्र नजीकच्या शाखेतून हस्तगत करावे.
०६. आपल्या उपस्थिती बाबत, उपस्थिती पावती सभेदरम्यान प्राप्त करावी.
०७. सन २०१८-१९ या वर्षाची लाभांशाची रक्कम भारतीय रिझर्व बँकेच्या मंजूरीस अधिन राहून दिनांक ३१/१०/२०१९ पर्यंत आपल्या खाती वर्ग करण्यात येईल.

टीप-

१. बँकेचा सन २०१८-१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल बँकेच्या सर्व शाखेंमध्ये उपलब्ध आहे. कृपया सन्माननीय सभासदांनी आपला अहवाल जवळच्या शाखेतून प्राप्त करुन घ्यावा.
२. बँकेच्या सभासदांसाठी भागाची किमान रक्कम रू.१०००/- निश्‍चित करण्यात आलेली आहे. ज्या सभासदांकडे या पेक्षा कमी भाग असतील, त्यांनी फरकाची रक्कम नजीकच्या शाखेत भरुन आपले सभासदत्व नियमित करुन घ्यावे, अन्यथा सहकारी कायद्याप्रमाणे व बँकेच्या स्विकृत पोटनियमाचे अधिन सभासदत्वास अपात्रता येवू शकते.

# सन्माननीय संचालक मंडळ (सन २०१६-२०२०)

| सौ.शरयु शरदराव हेबाळकर | श्री विजयकुमार शिवाजीराव कोपले |
|---|---|
| अध्यक्षा | उपाध्यक्ष |
| ९०४९९९८२८६ | ९०४९९९८३०३ |

| अ.क्र. | संचालकांचे नांव | दायित्व | मोबाईल व फोन क्र. |
|---|---|---|---|
| १ | मा.ना.सौ. पंकजाताई गोपिनाथराव मुंडे (पालवे) | संचालिका | ०२४४६-२२२०५४ |
| २ | मा.श्री राजाराम गोपाळराव धाट | संचालक | ७७२००५९९०१ |
| ३ | मा.डॉ.श्री दिगंबर जनार्दनराव दंडे | संचालक | ९०४९९९८२८७ |
| ४ | मा.श्री गौतमचंदजी नंदलालजी सोळंकी | संचालक | ९४२२५७९९८८ |
| ५ | मा.श्री पुरुषोत्तम श्रीकिशनजी भुतडा | संचालक | ९०४९९९८२८३ |
| ६ | मा.श्री चैनसुख रामकिशनजी जाजु | संचालक | ९०४९९९८२८५ |
| ७ | मा.श्री राजाभाऊ रामभाऊ दहिवाळ | संचालक | ९०४९९९८२८७ |
| ८ | मा.श्री गोविंद महादु कुडके | संचालक | ९०४९९९८२८९ |
| ९ | मा.ॲड.श्री राजेश्वर वसंतराव देशमुख | संचालक | ९०४९९९८२९१ |
| १० | मा.श्री बिपीन माणिकराव क्षिरसागर | संचालक | ७७२००५९९०२ |
| ११ | मा.ॲड.श्री मकरंद माधवराव पत्की | संचालक | ७७२००५९९०४ |
| १२ | मा.प्राचार्य श्री किसन मनोहरराव पवार | संचालक | ७७२००५९९०५ |
| १३ | मा.श्री जयवंत कमलाकरराव इटकुरकर (कुलकर्णी) | संचालक | ७७२००५९९०३ |
| १४ | मा.श्री भिमा भगवानराव ताम्हाणे | तज्ञ संचालक | ८४२२०७००५६ |
| १५ | मा.श्री अशोक विनायकराव कुलकर्णी | तज्ञ संचालक | ९०४९९९८२९३ |
| १६ | श्री सनतकुमार विठ्ठलराव बनवसकर | मुख्य कार्यकारी अधिकारी | ९०४९९९८२७२ |

| प्रमुख मार्गदर्शक | वैधानिक लेखापरिक्षक | समावर्ती लेखापरिक्षक | |
|---|---|---|---|
| श्री वसंतराव देवधर<br>विशेष सल्लागार | श्री व्हि.बी.वालवडकर<br>सनदी लेखापाल-अंबाजोगाई | व्हि.एन.वंगे ॲंड असोसिएटस्<br>एस.आर.गुंडलवार ॲंड कं.<br>आर.एन.लातूरकर ॲंड कं. | पी.सदाशिवराव पाटील ॲंड कं.<br>प्रसाद हराळे ॲंड असोसिएटस् |

## शाखा सल्लागार समिती

| शाखा-माजलगाव | शाखा-परळी | शाखा-नांदेड | शाखा- लातूर |
|---|---|---|---|
| श्री प्रकाश भिकचंदजी दुग्गड | श्री महादेव रामलिंग रुद्राक्ष | डॉ.सुरेशरावजी खुरसाले | श्री गुरुनाथ श्रीशैल्यप्पा मगे |
| श्री प्रकाश रामराव आनंदगांवकर | श्री सुभाषसेठ गिरीधारीलालजी ठक्कर | श्री एस.पी.वट्टमवार (सी.ए.) | श्री किशोर बाबुराव कुलकर्णी |
| श्री बाळासाहेब सर्वोत्तमराव देशपांडे | श्री रतनसेठ गोपालदासजी कोठारी | श्री विनायकरावजी नांदेडकर | श्री कुचेरिया विनोद बिरदीचंदजी |
| शाखा- उदगीर | | शाखा- देगलूर | |
| डॉ.श्री विद्यासागर देविदासराव अचोले | श्री प्रभाकर रामराव पेन्सलवार | श्री मयुर वसंतरावजी शुक्ला | श्री अनिल नारायणसेठ पदूकोन |
| डॉ.श्री सुनिल बाबुराव बनशेळीकर | श्री लक्ष्मीकांत मनोहरराव नेलवाडकर | डॉ.विनायक चंद्रसेनराव मुंडे | श्री भालचंद्र धुंडामहाराज देगलूरकर |

अहवाल वर्षात भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक, साहित्यीक, कलावंत, शिक्षणतज्ञ, भारतमातेचे रक्षण करतांना शहिद झालेले सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, बॅंकेचे सभासद, खातेदार, हितचिंतक, ज्ञात व अज्ञात अशा ज्या व्यक्तींचे निधन झाले, त्यांच्या कुटुंबीयांच्या द:खात दीनदयाळ परिवार सहभागी आहे. अशा सर्वांना

**नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रध्दांजली !**

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो !**



ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

## मुख्य कार्यालय अधिकारी

| सहा.सरव्यवस्थापक | वरिष्ठ अधिकारी | वरिष्ठ अधिकारी |
|---|---|---|
| श्री देशमुख प्रदिपकुमार महारुद्र (कर्ज व वसुली) ७७२००१७८६८ | श्री धिंगाणे महादेव भागवतराव (लेखा विभाग ) ९०४९९९८२७५ | **श्री पांडे अजय चंद्रकांतराव (वसुली व कायदे विभाग)** ९०४९९९८३०६ |

## बँकांच्या कार्यरत शाखा व शाखधिकरी

| अ.क्र. | शाखा | शाखेचा पत्ता | शाखाधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मुख्य शाखा | "व्यंकटेश भुवन " प्रशांत नगर, अंबाजोगाई, जि. बीड फोन नं. ०२४४६-२४८३९३ | कुसुमकर अशिष प्रकाशराव मो. ९०४९९९८२७१ |
| २ | माजलगांव | पोलीस कॉर्टर जवळ, बीड रोड, माजलगांव जि. बीड फोन नं. ०२४४३-२३५६८१ | देशमुख जगदिश गणेशराव |
| ३ | परळी | देशमूख पेट्रोल पंप जवळ, नांदेड रोड, परळी जि. बीड फोन नं. ०२४४६-२२५७७४ | प्रविण पांडूरंगराव रेवलकर मो. ९०४९९९८३०५ |
| ४ | पालम | सिरसकर कॉम्पलेक्स, फळा-परकंडा रोड, पालम जि. परभणी फोन नं. ०२४५३-२७०२७० | बालू विठ्ठलराव मोरे मो. ९०४९९९८२७६ |
| ५ | परळी रोड शाखा | "दीनदयाळ भवन "बस डेपो जवळ, परळी रोड, अंबाजोगाई, जि. बीड फोन नं. ०२४४६-२४६०७७ | फड प्रविण भरतराव मो. ९०४९९५३३६६ |
| ६ | नांदेड | "अनंतश्रीसंकूल"महाविर चौक, नांदेड जि. नांदेड. फोन नं. ०२४६२-२३७१२३ | समिर एकनाथराव बनवसकर मो. ९०४९९९८३०८ |
| ७ | उदगीर | "पेन्सलवार बिल्डींग"नांदेड - बिदर रोड, उदगीर जि. लातूर फोन नं. ०२३८५-२५२९२७ | सुनिल व्यंकटराव देशपांडे मो. ९०४९९९८२९८ |
| ८ | लातूर | "शंकर हेरीटेज"तापडीया मार्केट समोर, चैनसुख रोड, लातूर जि. लातूर फोन नं. ०२३८२-२५५१५० | स्वामी कैलास गंगाधरराव मो.९०७५०३२६२० |
| ९ | देगलूर | रुग्णसेवा मंडळ दवाखान्या समोर, पोलीस स्टेशन जवळ, देगलूर जि. नांदेड फोन नं. ०२४६३-२५६९२७ | कुलकर्णी पंकज प्रकाशराव ९०७५०३२६१६ |
| १० | परतूर | "पवार कॉम्प्लेक्स"शासकीय विश्राम गृहाजवळ, मेनरोड, परतूर जि. जालना फोन नं. ०२४८४-२२००१ | डोंगरे श्रीपाद गोपाळराव |
| ११ | धारूर | व्ही.के. मोटार्स जवळ, केज रोड, धारुर जि. बीड फोन नं. ०२४४५-२७४३९३ | अघाव नवनाथ व्यंकटराव ९०४९९९८२९७ |
| १२ | परभणी | दुर्गेश्वरी बिल्डींग, गव्हाणे चौक, परभणी फोन नं. ०२४५२-२२९९२६ | अभय लक्ष्मीकांतराव लाठकर मो. ९०४९९९८२६८ |
| १३ | नायगांव बाजार | पाटील कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, नायगांव, जि. नांदेड फोन नं. ०२४६५-२६२९२७ | देशमुख स्वप्नील चंडीदासराव मो. ८४११८८४२३९ |
| १४ | औरंगाबाद | सहकार चौक, दीप नगर, दर्गा रोड, औरंगाबाद फोन नं. ०२४०-२३४३५१५ | कुलकर्णी विजय रत्नाकरराव मो. ९०७५०३२६१४ |
| १५ | अहमदपूर | न्यु शॉपिंग सेंटर, महात्मा गांधी कॉलेज रोड, अहमदपूर फोन नं. ०२३८१-२६३६१६ | किंबहुणे गणेश प्रभाकरराव ९३७०९९२६०५ |
| १६ | जालना | ठक्कर कॉम्पलेक्स, मम्मदेवी ते रेल्वे स्टेशन रोड, जालना फोन नं. ०२४८२-२३१३१८ | होळकर अजिंक्य रविंद्र मो. ८९९९५४२१५४ |
| १७ | बीड | 'कासट कॉम्पलेक्स', गजानन कॉलनी, सहयोग नगर, बीड. फोन नं. ०२४४२-२३०२५५ | प्रसाद सुर्यकांतराव मोरगांवकर मो. ८४११८८४२३२ |

# परिशिष्ट- अ

रक्कम लाखात

| | | |
|---|---|---|
| **बँकेचे नांव** | दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई | |
| **मुख्य कार्यालय पत्ता** | दीनदयाळ भवन, परळी रोड, अंबाजोगाई, जि.बीड. | |
| **नोंदणी क्रमाक व दिनांक** | Beed/B.H.R./BANK,(O)/108/96-97 Dated 30/05/1996 | |
| **स्थापना दिनांक** | ०२ जून १९९७ | |
| **रिझर्व बँक परवाना क्र. व दिनांक** | UBD.MAH. 1357 P Dated 20/01/1997 | |
| **कार्यक्षेत्र** | महाराष्ट्र राज्य | |
| **तपशील दिनांक** | ३१ मार्च २०१९ | |
| **मुख्य कार्यालयासह शाखा** | १७ + १ | |
| **सभासद** | नियमीत सभासद | ११०७४ |
| | कर्जदार नाममात्र सभासद | १८२७ |
| | इतर नाममात्र सभासद | ८८७३ |
| | **एकूण** | **२१७७४** |
| **भागभांडवल** | अधिकृत भागभांडवल | २०००.०० |
| | वसुल भागभांडवल | ९१७.९१ |
| **एकूण निधी** | | १७०१.६८ |
| **एकूण ठेवी** | बचत ठेव | ५०५७.६६ |
| | चालू ठेव | ११७०.१३ |
| | मुदती ठेव | २३३३०.७० |
| | **एकूण** | **२९५५८.४९** |
| **एकूण कर्ज** | लघू मुदती कर्ज | ६९९९.८२ |
| | मध्यम मुदती कर्ज | ४४२९.०४ |
| | दिर्घ मुदतीकर्ज | ५८५१.३१ |
| | **एकूण** | **१७२८०.१७** |
| **अग्रक्रम व दुर्बल घटकातील कर्जे शेकडा प्रमाण** | अग्रक्रम व दुर्बल घटकातील कर्जे | ६०.०१% |
| | पैकी दुर्बल घटकातील कर्जे | २६.८९% |
| **घेतलेली कर्जे** | | ०.०० |
| **गुंतवणूक** | महाराष्ट्र स्टेट व जिल्हा मध्यवर्ती बँक भाग रक्कम | ०.०४ |
| | सरकारी रोखे | ६२०७.६३ |
| | अन्य गुंतवणूक | ४०८१.८८ |
| | **एकूण** | **१०२८९.५५** |
| **ढोबळ अनुत्पादक कर्ज** | रक्कम | १२०३.६२ |
| | येणे कर्जाशी प्रमाण | ६.९७% |
| **निव्वळ अनुत्पादक कर्ज** | रक्कम | ६५८.६२ |
| | निव्वळ कर्जाशी प्रमाण | ३.९४% |
| **करपूर्व नफा** | | ३४७.६३ |
| **उत्पन्न कर रक्कम** | | १९१.१९ |
| **करपश्चात नफा (निव्वळ नफा)** | | १५६.४४ |
| खेळते भांडवल | | ३३३०२.९९ |
| एकूण कर्मचारी | | १५१ |
| ऑडीट वर्ग (सन २०१८-१९) | | ‘अ’ |

मान्यवर,

**सर्व मा.सभासद बंधू भगिनींनो,**

सप्रेम नमस्कार!!

आपली विश्वासु

सौ.शरयुताई श. हेबाळकर

## सभासद व भाग भांडवल-


आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये नियमित सभादात १००८ सभासदांची वाढ झालेली असून भाग भांडवलाच्या रकमेत सभासद राजिनाम्यांची रक्कम वजा जाता रु. ८०.७९ लाख रकमेची एकूण वाढ झालेली आहे. ३१ मार्च २०१९ अखेर **एकूण सभासद संख्या ११०७५** होवून बँकेचे **भाग भांडवल रु.९१७.९१ लाख** झालेले आहे. सभासदांच्या भागाची रक्कम रु.१०००/- च्या पटीत करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. बँकेच्या बहुतांश सभासदांनी यासाठी प्रतिसाद दिलेला असून उर्वरीत भागधारकही निश्चितच लवकरच फरकाची रक्कम भरुन सर्व भागधारकांचे भाग रु.१०००/- च्या पटीत होण्यासाठी सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे.


सभासदांची संख्या व भाग भांडवलाच्या रकमेतील वाढते प्रमाण पाच वर्षांच्या आलेख स्तंभातुन स्पष्ट होत आहे.

## राखिव निधी व एकूण निधी-

अहवाल वर्षात बँकेच्या राखिव निधीत रु.९०.८४ लाख रकमेची तर एकूण निधीमध्ये रु.३१२.६९ लाख रकमेची वृध्दी होवून ३१ मार्च २०१९ अखरे एकूण राखिव निधी रु.५३२.०२ लाख व एकूण निधी रु.१७०१.६८ लाख झालेला आहे.

बँकेचा राखिव निधी व एकूण निधीच्या रकमेचे वाढते प्रमाण आलेख-स्तंभाव्दारे अधिक सुस्पष्ट करित आहोत.



## ठेवी

आर्थिक वर्ष २०१७-१८ अखेरच्या एकूण ठेवीमध्ये आर्थिक वर्ष २०१८-१९ या वर्षात रू.४४७१.२५ लाख रकमेची निव्वळ वाढ होवून ३१ मार्च २०१९ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रू.२९५५८.४९ लाख आहेत. बँकेच्या एकूण ठेवीमध्ये 'बचत व चालू ठेवी' (लो कॉस्ट / कासा डिपॉझीट) रू.६२२७.७९ लाख असून त्याचे एकूण ठेवीशी २१.०७ टक्के प्रमाण आहे.


## ठेव विमा

बँकेने डिपॉझीट इन्शुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन १९६१ अन्वये भरावी लागणारी ठेवीच्या विमा प्रिमियमची आवश्यक ती रक्कम भरुन बँकेच्या ठेवीदारांची ठेव सुरक्षित केली आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात बँकेने ठेव विम्यापोटी एकूण रू.३१.१७ लाख एवढी रक्कम विहित मुदतीत डिपॉझीट इन्शुरन्स अँड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन यांच्या खाती वर्ग केली आहे.


## कर्जे

आर्थिक वर्ष २०१७-१८ अखेरच्या एकूण कर्जामध्ये आर्थिक वर्ष २०१८-१९ या वर्षात रू.६१०.९६ लाख रकमेची निव्वळ वाढ होवून ३१ मार्च २०१९ अखेर बँकेची एकूण कर्जे रू.१७२८०.१७ लाख आहेत. बँकेने कर्ज वितरण करतांना केवळ संख्यात्मक कर्जवृध्दीचे धोरण न ठेवता कर्ज गुणवत्ता वृध्दीस अधिक महत्व दिलेले आहे. तसेच प्राधान्यक्षेत्र व दुर्बल घटक (प्रायॉरिटी अँड विकर सेक्शन) कर्जाचे प्रमाण भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशाप्रमाणे राखले आहे. परिणामी बँकेच्या कर्जवृध्दीचे प्रमाण मागील वर्षीच्या तुलनेने कमी आहे. बँकेच्या एकूण कर्जाचे एकूण ठेवीशी प्रमाण (सी.डी.रेशो) ५८.४६ टक्के आहे.

**बँकेच्या तीन आर्थिक वर्षाच्या एकूण ठेवी, पैकी कासा ठेवी, एकूण कर्जे व सिडी रेशो**




**बँकेच्या तीन आर्थिक वर्षाच्या एकूण ठेवी, एकूण कर्जे व एकूण व्यवसाय**



## बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडील कर्जे

बँकेने, बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना वितरीत करावयाच्या कर्जाबाबत भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन केलेले आहे. परिणामी ३१ मार्च २०१९ अखेर बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडील कर्जे 'निरंक' आहेत.


## थकित व एन.पी.ए.कर्ज वसुली व नियंत्रण

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या प्रारंभी बँकेच्या अनुत्पादित कर्जाची रक्कम रु.१२७३.८१ असून त्याचे एकूण कर्जाशी असलेले ढोबळ प्रमाण ७.६४ टक्के होते. बँकेने अहवाल वर्षात रु.३८५.९४ रकमेची थकित कर्जाची वसुली केली असून ३१ मार्च २०१९ अखेर अनुत्पादित कर्जाची रक्कम रु.१२०३.६२ आहे, ज्याचे एकूण कर्जाशी असलेले ढोबळ प्रमाण ६.९७ टक्के आहे. मागील वर्षी अनत्पादित कर्जाचे निव्वळ प्रमाण ५.३७ टक्के होते, जे की या वर्षी म्हणजेच ३१ मार्च २०१९ अखेर ३.९४ टक्के झालेले आहे. यावरुन थकित कर्ज वसुलीवर बँकेचे नियंत्रण असल्याचे आपल्या लक्षात येईलच. त्यासाठी बँकेने कार्यक्षम कर्मचारी वर्ग थकित कर्ज वुसली कामी नियुक्त केलेला आहेच, आपले सहकार्यही महत्वाचे आहेच.

## गंतवणक

आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर बँकेची एकूण गुंतवणुक रु.१०२८९.५५ लाख आहे. अहवाल वर्षात मागील वर्षीच्या एकूण गुंतवणुकीत रु.२९७४.९७ लाख रकमेची वाढ झालेली आहे. बँकेने वैधानिक तरलता व गुंतवणुकीचे प्रमाण या संदर्भात भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन केलेले आहे. बँकेची गुंतवणुक ही बँकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे. अहवाल वर्षात बँकेस गुंतवणुकीमधून रु.७८७.११ लाख उत्पन्न मिळाले आहे. तर बँकेने सरकारी रोखे खरेदी विक्री व्यवहारातून रु.२२.४६ लाख नफा मिळवला आहे.



## कर्मचारी वृंद व प्रशिक्षण कार्यक्रम

३१ मार्च २०१९ वरील कार्यरत पदनिहाय कर्मचारी वृंद तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पद | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| ०१ | मुख्य कार्यकारी अधिकारी | ०१ |
| ०२ | सहा. सरव्यवस्थापक | ०२ |
| ०३ | वरिष्ठ अधिकारी | ०२ |
| ०४ | कनिष्ठ अधिकारी | ४६ |
| ०५ | लिपीक | ६७ |
| ०६ | सेवक / रखवालदार | ३३ |
| | एकुण | १५१ |

बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञानामध्ये सातत्यने बदल होत आहेत. या बदलांना सामोरे जाण्यासाठी कुशल व कुशाग्र कर्मचारी वृंदाची गरज तर आहेच, त्याचबरोबर त्यांचे ज्ञान आद्ययावत ठेवणेही तेवढेच महत्वाचे आहे. बँकेतील कर्मचा-यांचे ज्ञान वृध्दींगत व्हावे व सर्व कर्मचा-यांचे तांत्रिक ज्ञान आद्ययावत रहावे यासाठी बँक नेहमीच जागृत असते. त्यासाठी वेळोवेळी कर्मचा-यांना बाहेरील प्रशिक्षणासाठी पाठवणे, अंतर्गत प्रशिक्षणाचे आयोजन करणे, बाहेरील तज्ञ व्यक्तींना प्रशिक्षण देण्यासाठी बोलावणे अशा विविध मार्गाने बँकेच्या कर्मचा-यांना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे. बँकेच्या कर्मचा-यांनी विविध प्रशिक्षण केंद्र आयोजित तसेच भारतीय रिझर्व बँक आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घेतलेला आहे. तसेच अहवाल वर्षात मा.संचालकांनीही योग्य त्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदवलेला आहे.

## संचालक मंडळ व समिती सभा

अहवाल वर्षात मा.संचालक मंडळ व विविध उपसमिती यांच्या खालील प्रमाणे सभा संपन्न झालेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मा. वार्षिक सर्वसाधारण सभा | ०१ |
| २ | संचालक मंडळ | १३ |
| ३ | वसुली समिती | ११ |
| ४ | कर्ज समिती | ६६ |
| ५ | गुंतवणूक समिती | १२ |
| ६ | लेखापरीक्षण समिती | ०५ |
| ७ | प्रशासन समिती | ११ |
| ८ | ए.एल.एम.समिती सभा | ०४ |
| ९ | खरेदी समिती | १२ |
| १० | कार्यक्रम व उपक्रम समिती | ०३ |
| ११ | तंत्रज्ञान व तंत्रज्ञान सुरक्षा समिती | ०४ |
| | एकूण | १४२ |


बँकेच्या सर्वांगीण विकासासाठी बँकेचे संचालक मंडळ सातत्याने प्रयत्नशील असते. बँकिंग आर्थिक विकासाच्या ध्येय प्राप्तीसाठी आवश्यक गुणवत्ता धारण करून त्याचा सर्वतोपरी सकारात्मक परिणाम कसा होईल यावर संचालक मंडळाने लक्ष केंद्रीत केलेले आहे.

सद्यस्थितीत बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञान केंद्रस्थानी आले आहे. या तंत्रज्ञानाबरोबरच प्रभावी व कुशल मनुष्यबळ, विविध प्रकारची प्रणाली, जोखीम आणि अनुपालन या पार्श्वभुमीवर संचालक मंडळास निर्णय घेणे क्रमप्राप्त झालेले आहे. त्याचबरोबर बँकेचे धोरण, भारतीय रिझर्व बॅकेच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन, सहकारी कायदयाचे पालन करून विश्वस्ताची भूमिका बजावून सभासदांच्या वतीने महत्वाचे निर्णय घेण्याची जबाबदारी संचालक मंडळावर असते.

सर्व जबाबदा-या व कर्तव्यांचे व्यवस्थित पालन व्हावे, यासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आलेले आहेच. या विविध समित्यांच्या तसेच मा.संचालक मंडळाच्या आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये सोबतच्या परिशिष्टानुसार नियमीत सभा संपन्न झालेल्या आहेत.

## नफा व प्राप्तीकर कायदा

आर्थिक वर्ष २०१८-१९ या वर्षात बँकेचा एकुण (Surplus) वाढावा (तरतुद व करपूर्व) रु.४९९.८३ लाख असून आवश्यक तुरतुदी रु.१५२.२० लाख रकमेच्या केलेल्या आहेत. तरतुद वजा जाता बँकेचा करपूर्व नफा रु.३४७.६३ लाख आहे. प्राप्तीकर कायाद्यानुसार उत्पन्नावरील कराची रक्कम रु.१९१.१९ लाख असून सदर रक्कम वजा जाता बँकेस रु.१५६.४४ लाख निव्वळ नफा प्राप्त झालेला आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत अहवाल वर्षात निव्वळ नफयात रु.५५.५३ लाख रकमेची वृध्दी दिसून येते.




## नफा-तोटा पत्रकाचे विवेचन

आर्थिक वर्ष २०१८-१९ या वर्षातील बँकेचे एकूण उत्पन्न रु.३२८१.४१ लाख असून पैकी रु.३१२४.९७ लाख एकुण खर्च आहे. सविस्तर तपशील पुढील कोष्टकात नमुद केलेला आहे.

**२०१८-१९- उत्पन्न व खर्च यांचे एकूण उत्पन्नाशी व खेळत्या भांडवलाशी प्रमाण-**

**३१-०३-२०१९ वरील बँकेचे खेळते भांडवल- रु.३३३०२.९९ लाख**

| तपशिल | रक्कम लाखात | एकूण उत्पन्नाशी प्रमाण | खेळत्या भांडवलाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| व्याजातुन मिळालेले उत्पन्न | ३१२६.७६ | ९५.२९ | ९.३९ |
| सरकारी कर्ज रोखे विक्री नफा | २२.४६ | ०.६८ | ०.०७ |
| इतर उत्पन्न, बटाव ई. | १३२.१९ | ४.०३ | ०.४० |
| **एकूण उत्पन्न** | **३२८१.४१** | १००.०० | ९.८५ |
| व्याजासाठीचा खर्च | १८५७.४२ | ५६.६० | ५.५८ |
| कर्मचारी वेतन व भत्ते खर्च | ४१४.८७ | १२.६४ | १.२५ |
| इतर खर्च | ५०९.२९ | १५.५२ | १.५३ |
| **एकूण (तरतुदपूर्व व करपूर्व) खर्च** | **२७८१.५८** | ८४.७७ | ८.३५ |
| तरतुदपूर्व व करपूर्व नफा | ४९९.८३ | १५.२३ | १.५० |
| पैकी आवश्यक तरतुदीपोटी झालेला खर्च | १५२.२० | ४.६४ | ०.४६ |
| करपूर्व नफा | ३४७.६३ | १०.५९ | १.०४ |
| .उत्पन्न कर | १९१.१९ | ५.८३ | ०.५७ |
| **एकूण खर्च** | **३१२४.९७** | ९५.२३ | ९.३८ |
| निव्वळ नफा | १५६.४४ | ४.७७ | ०.४७ |

## नफा विभागणी


आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये बँकेस प्राप्त झालेल्या निव्वळ नफयाची विभागणी सहकार कायदा तसेच भारतीय रिझर्व बँकेची मार्गदर्शक तत्वे यास अधिन राहून खालील प्रमाणे करणे बाबत संचालक मंडळ शिफारस करित आहे.

| विवरण | रक्कम |
|---|---|
| नफा तोटा पत्रकानुसार नफा | १५६,४४,२१४.३५ |
| मागील वर्षाचा पुढे ओढलेला नफा | १,०९८.९४ |
| नफा विभगणीसाठीचा नफा | १५६,४५,३१३.२९ |
| प्रस्तावित नफा विभागणी | |
| वैधानिक गंगाजळी (राखिव निधी) २५ टक्के | ३९,१२,०००.०० |
| इमारत निधी | १५,८८,०००.०० |
| लाभांष (२०१८-२०१९) वसुल भागभांडवलाच्या ९ **टक्के** | ७७,९६,६०६.०० |
| सभासद कल्याणनिधी | ३,१३,०००.०० |
| कर्मचारी कल्याणनिधी | ३,१३,०००.०० |
| लाभांष समाणीकरण निधी | ३,१३,०००.०० |
| धर्मादाय निधी | ३,१३,०००.०० |
| आय.टी.फंड | ७,८२,०००.०० |
| प्रुडन्शिअल रिझर्व फंड | ३,१३,०००.०० |
| पुढे ओढावयाचा नफा | १७०७.२९ |

### लाभांष (२०१८-२०१९)

बँकेच्या सन्माननिय सभासदांना त्यांच्या भाग भांडवलाच्या ९ टक्के प्रमाणे लाभांष वितरीत करण्याची संचालक मंडळ शिफारस करीत आहे. बँकेस प्राप्त झालेल्या निव्वळ नफयाच्या ५० टक्के रक्कम ही लाभांष वितरणासाठी खर्च करण्यासाठी शिफारस करीत आहोत.

सन्माननिय सभासदांना विनंतीपूर्वक निवेदन करण्यात येत आहे की, लाभांष वितरण हे भारतीय रिझर्व बँकेच्या मंजूरीस अधिन राहून करण्यात येणार आहे. करीता लाभांष वितरणासाठी देण्यात आलेल्या कालावधीमध्ये अंशत: बदल होवू शकतो.







## आदा न झालेला लाभांष-

बँकेच्या ताळेबंदानुसार सन २०१५-१६ या वर्षाची अदा न झालेल्या लाभांषाची रक्कम रु.१०६४९१३/- आहे. सदरील रक्कम गंगाजळी खाती वर्ग करण्याबाबत संचालक मंडळांनी शिफारस केलेली आहे. आपल्या मान्यतेस्तव सविनय सादर.

## भांडवल पर्याप्तता प्रमाण-

| CRAR | | | |
|---|---|---|---|
| Particulers | Mar-18 | Mar-19 | Exc/Dif % |
| **Tiar -I Capital** | | | |
| Share Capital | 837.12 | 917.91 | 9.65% |
| Reserve Fund | 441.18 | 532.02 | 20.59% |
| Other Reseve Fund | 351.90 | 414.70 | 17.85% |
| Surplus in Profit & Loss | 42.30 | 82.60 | 95.27% |
| Total -1 | 1672.50 | 1947.23 | 16.43% |
| **Tiar-II Capital** | | | |
| Revaluation Reserves | 6.25 | 6.25 | 0.00% |
| Std. Provisions | 63.80 | 66.00 | 3.45% |
| Investment Flac. Fund | 65.05 | 70.05 | 7.69% |
| Total -2 | 139.44 | 146.64 | 5.16% |
| **A) Total (1+2)** | 1811.94 | 2093.87 | 15.56% |
| **Risk Assets** | | | |
| Funded Asstes | 16777.17 | 17834.59 | 6.30% |
| Non-Funded Asstes | 0 | 0.00 | 0.00% |
| **B) Risk Weighted Assets** | 16777.17 | 17834.59 | 6.30% |
| **CRAR** | 10.80% | 11.74% | 8.70% |

गुंतवणूक म्हणजे एखादे झाड लावण्यासारखे असते. जर नियमित देखरेख केली आणि विकासासाठी पुरेसा वेळ दिला की आपल्याला चांगल्या परिणामांची अपेक्षा करता येऊ शकते.



पारंपारिकरित्या गुंतवणूकदार सोने, जमीन आणि रिअल इस्टेटीमध्ये गुंतवणूक करणे पसंत करतात. सद्यस्थितीत अनेक गुंतवणूकदार स्टॉक आणि म्युच्युअल फंडासारख्या आर्थिक मालमत्तांची निवड करु लागले आहेत.

### स्टॉक आणि म्युच्युअल फंड

शेअर्स(भागभांडवल)/स्टॉक्स- हे कंपनीमधल्या व्याजावरील मालकी प्रतिबिंबित करतात. शेअर्स किंवा भागभांडवल गुंतवणूकदारासोबत शेअरधारकाला अधिकार देतात, ज्यात गुंतवणूकदार अॅन्युअल जनरल मिटिंगमध्ये सहभागी होऊन मतदान करु शकतात. ही उत्पादने कंपनीद्वारे तिच्या कार्यांमधून मिळवल्या गेलेल्या नफ्याच्या आधारावर परतावा कमवून देतात. कंपनीच्या व्यवसायातल्या नफ्याच्या आधारावर हा परतावा कमी जास्त होऊ शकतो. ही उत्पादने अनेक लाभ देऊ शकतात, परंतु गुंतवणूकदाराने गुंतवणूकीआधी कंपनीचा व्यवसाय नीट समजून घेणे आवश्यक आहे. व्यक्ती दीर्घकालीन गुंतवणूक नियोजन असण्याच्या स्थितीत या साधनांमध्ये गुंतवणूकीचा निर्णय घेऊ शकते.


### अर्थसंकल्प तयार करणे

अर्थसंकल्प तयार करणे म्हणजे उत्पन्न आणि खर्चाचा समतोल साधण्याची कलाच आहे, ज्यामुळे आपले खर्च नेहमी आपल्या उत्पन्नाहून कमी राहण्याची खात्री मिळते. जर अतिरिक्त पैसे शिल्लक राहिले तर ते आपल्या भविष्यातील गरजांसाठी गुंतवता येऊ शकतात.

**उत्पन्न विरुद्ध खर्च**




**कर्ज घेणे**



# कार्य मुल्यांकनाचे मापदंड

भारतीय रिझर्व बँकचे परिपत्रक क्र. श.ब.वि.के.का.बी.पी./पी.सी.बी./२०/१६-४५-००/२००२-२००३, दिनांक ३०.१०.२००२ अन्वयेच्या कार्य मुल्यांकनाचे मापदंड प्रसिध्द करणे, बाबतच्या सुचनेनुसार खालील प्रमाणे अहवाल सादर.

## Disclosure of Information as per RBI Guidelines

Rs.in lac

| Sr.No. | Particulars | 31.03.2018 | 31.03.2019 |
|---|---|---|---|
| 1 | Capital To Risk Asset Ratio | 10.80% | 11.74% |
| 2 | Capital Adequacy Ratio Tier I Capital | 9.97% | 10.92% |
| 3 | Capital Adequacy Ratio Tier II Capital | 0.83% | 0.82% |
| | **Movement of CRAR** | | |
| | a. Capital Tier I | 1672.50 | 1947.23 |
| | b. Capital Tier II | 139.44 | 146.64 |
| | c. Total of Tier I and Tier II | 1811.94 | 2093.87 |
| | d. Total of Risk Weighted Assets | 16777.17 | 17834.59 |
| **4** | **Investment** | | |
| | I. Government Security | | |
| | • Book value | 5628.03 | 6207.63 |
| | • Face value | 5650.00 | 6250.00 |
| | II. Other Investment | 1686.51 | 4081.88 |
| | III. Shares of Co-op society | 0.04 | 0.04 |
| | **Total** | **7314.58** | **10289.55** |
| 5 | Advances Against Shares & Debentures | 0.00 | 0.00 |
| **6** | **Lending to Sensitive Sectors** | | |
| | A. Real Estate & Construction Business | 130.95 | 236.45 |
| | B. Housing Loans | 1752.71 | 1734.58 |
| 7 | Advances to Directors, their Relatives, Companies and Firms in which they are interested. | 0.00 | 0.00 |
| 8 | Deposit | | |
| | % of Hign cost deposits to total deposits | 78.40% | 78.93% |
| | Average cost of deposit | 6.88% | 6.91% |
| **9** | **NPAs** | | |
| i | Gross NPA | 1273.81 | 1203.62 |
| ii | Gross NPA % | 7.64% | 6.97% |
| iii | Net NPA | 873.81 | 658.62 |
| iv | Net NPA % | 5.37% | 3.94% |
| **10** | **Movement in NPAs** | | |
| i | At the beginning of the year | 859.77 | 1273.81 |
| ii | Recovery of NPA | 197.97 | 385.94 |
| iii | Additions | 612.01 | 315.75 |
| iv | At the end of the year | 1273.81 | 1203.62 |
| **11** | **Profit and Loss Account** | | |
| a | Interest Income as a percentage of Working Capital | 9.27% | 9.39% |
| b | Non Interest Income as a percentage of Working Capital | 0.43% | 0.46% |
| c | Operating Profit as a percentage of Working Capital | 0.56% | 1.19% |
| d | Return on Assets | 0.36% | 0.52% |
| e | Administrative Expanses to working capital | 2.38% | 2.61% |
| f | Business per employee | 276.53 | 310.19 |
| g | Gross profit (Profit before tax) per employee | 0.96 | 2.30 |
| h | Net Interest Margin | 3.93% | 4.68 |

| | | | |
|---|---|---|---|
| **12** | **Provisions** | | |
| i | NPAs (BDDR) Provision | 400.00 | 545.00 |
| ii | Standard Asset provision | 63.80 | 66.00 |
| iii | Investment Fluctuation Fund | 65.05 | 70.05 |
| iv | Investment Depreciation Fund | 4.34 | 4.34 |
| **13** | **Movement in provsions** | | |
| | i. **NPAs (BDDR) Provision** | | |
| | • At the beginning of the year | 300.00 | 400.00 |
| | • Provision made during the year (Add.) | 100.00 | 145.00 |
| | • Total Provision | 400.00 | 545.00 |
| | ii. **Standard Asset provision** | | |
| | • At the beginning of year the year | 46.30 | 63.80 |
| | • Provision made during the year (Add.) | 17.50 | 02.20 |
| | • Total Provision | 63.80 | 66.00 |
| | iii. **Investment Fluctuation Fund** | | |
| | • At the beginning of the year | 65.05 | 65.05 |
| | • Provision made during the year (Add.) | 0.00 | 5.00 |
| | • Total Provision | 65.05 | 70.05 |
| | iv. **Investment Depreciation Fund** | | |
| | • At the beginning of the year | 0.55 | 4.34 |
| | • Provision made during the year (Add.) | 3.79 | 0.00 |
| | • Total Provision | 4.34 | 4.34 |
| 14 | Foreign Currency Assets & Liabillities | 0.00 | 0.00 |
| 15 | DICGC Premium paid | 26.51 | 31.17 |
| 16 | Opening Balance of amounts transferred to DEAF | 7.69 | 10.16 |
| 17 | Add: Amounts transferred to DEAF during the year | 2.47 | 03.45 |
| 18 | Less: Amounts reimbursed by DEAF towards claims | 0.00 | 0.00 |
| 19 | Closing balance of amounts transferred to DEAF | 10.16 | 13.61 |
| 20 | Networth of the Bank | 1762.31 | 2154.74 |

## बँकेच्या सुविधा

- कोअर बँकींग सोल्युशन
- आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी.
- आय.एम.पी.एस.सुविधा
- इन्शुरन्स सुविधा
- एटीएम सुविधा
- गॅस सिलेंडर सबसिडी
- प्रधानमंत्री जीवन बीमा योजना
- प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना
- एस.एम.एस.सुविधा
- पी.ओ.एस. पॉईंट ऑफ सेल
- सोने तारण व विविध कर्ज योजना
- आकर्षक मुदत ठेव योजना

प्रत्येक परिवाराची,
परिवारातील प्रत्येकाची एकच बँक.....
आपली दीनदयाळ बँक!

## आपली वैशिष्टे

- ✓ कर्जासाठी किमान व्याजदर.
- ✓ त्वरित व सुलभ कर्ज वितरण.
- ✓ कर्ज छाननी व इतर शुल्क अल्प.
- ✓ कर्जासाठी कोणतेही छुपे खर्च नाहीत.
- ✓ सुलभ इ.एम.आय.ची रचना
- ✓ दैनंदिन शिल्लक रकमेवर व्याज
- ✓ छोटया व्यापा-यांसाठी कर्ज योजना
- ✓ दीनदयाळ व्यापार समृध्दी कर्ज योजना

**सन २०१८-२०१९ सालात अंदाजपत्रका प्रमाणे कमी जास्त झालेल्या खर्चाची नोंद घेवून मंजूरी देणे व सन २०१९-२०२० वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.**

| अ. | खर्चाचा प्रकार | सन २०१८-१९ | | | सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| क्र. | | प्रत्यक्ष झालेला खर्च | अंदाज पत्रकीय तरतुद | कमी/ जास्त | अंदाज पत्रकीय तरतुद |
| १ | व्याज दिले ठेवीवरील | १८५७.३४ | २१७२.१२ | ३१४.७८ | २३१५.८६ |
| २ | व्याज दिले कर्जावर | ०.०८ | ८.९६ | ८.८८ | ०.०० |
| ३ | वेतन,भत्ते,भ.नि.नि.व रजा रोखीकरण | ४१४.८७ | ४६५.३२ | ५०.४५ | ४७६.०० |
| ४ | संचालक सभा भत्ता व सभा खर्च | २.१७ | २.२७ | ०.१० | २.५० |
| ५ | इमारत भाडे | ५४.९८ | ७४.६९ | १९.७१ | ६०.४८ |
| ६ | व्यवसाय कर | ०.०३ | ०.०३ | ०.०० | ०.०३ |
| ७ | विमा | १.२९ | २.१९ | ०.९० | १.४३ |
| ८ | विदुयत खर्च | २०.४७ | १८.४१ | -२.०६ | २४.५६ |
| ९ | टपाल खर्च | ०.४० | १.६३ | १.२३ | १.५० |
| १० | दुरध्वनी खर्च | ६.७७ | १६.१० | ९.३३ | ८.५० |
| ११ | लेखा अंकेक्षण फीस खाते | ९.०६ | ९.०२ | -०.०४ | १२.०० |
| १२ | घसारा | ११८.१७ | १२४.४१ | ६.२४ | १३५.९० |
| १३ | दुरुस्ती व देखभाल | ५२.११ | ४७.१४ | -४.९७ | ८३.९६ |
| १४ | छपाई व स्टेशनरी | ९.०७ | १५.०० | ५.९३ | १२.०० |
| १५ | जाहीरात खर्च | २.७६ | ४.५० | १.७४ | ५.०० |
| १६ | गुंतवणुक चढ उतार निधी | ५.०० | १०.०० | ५.०० | १०.०० |
| १७ | गुतवणुकवरील घसारा | ०.०० | ५.०० | ५.०० | ५.०० |
| १८ | संशयीत व बुडीत थकीत व्याज निधी | १४५.०० | २५.०० | -१२०.०० | १००.०० |
| १९ | उत्तम जिंदगी निधी | २.२० | १०.०० | ७.८० | ५.५० |
| २० | किरकोळ व कार्यालयीन खर्च | १३.४० | १८.१८ | ४.७८ | १६.०० |
| २१ | कार्यक्रम व उपक्रम | ४.१४ | ६.२७ | २.१३ | ५.०० |
| २२ | प्रवास खर्च | ६.८१ | ७.९७ | १.१६ | १०.०० |
| २३ | मेबरशिप फीस असोसिऐशन | १.३९ | २.०३ | ०.६४ | १.७० |
| २४ | कायदेशिर खर्च व सल्ला खर्च | ३.२६ | १.७५ | -१.५१ | ५.०० |
| २५ | कमीशन | ७.४८ | २०.२० | १२.७२ | १०.०० |
| २६ | डिआयसीजीसी | ३१.१७ | ३०.२३ | -०.९४ | ३७.४६ |
| २७ | सर्व साधारण सभा | १.८७ | १.७५ | -०.१२ | ३.०० |
| २८ | धनसंचय कमिशन | ९०.२४ | १२०.०० | २९.७६ | ९९.२५ |
| २९ | प्रशिक्षण खर्च | १.७२ | १.५७ | -०.१५ | ५.०० |
| ३० | वसुली खर्च | १.२२ | ०.७५ | -०.४७ | ५.०० |
| ३१ | सरकारी रोखे प्रिमीयम | २.५९ | २.८८ | ०.२९ | ४.०० |
| ३२ | नगरपालिका कर | १.३२ | ३.०० | १.६८ | १.६० |
| ३३ | भरती खर्च | ०.०० | ०.५० | ०.५० | १.०० |
| ३४ | कर्जखाते रिटन ऑफ | ५२.६८ | ०.०० | -५२.६८ | ०.०० |
| ३५ | डिफर टॅक्स तरतुद | ३.२५ | ०.०० | -३.२५ | ०.०० |
| ३६ | जि.एस.टी. खर्च | ९.४७ | ६.९७ | -२.५० | १०.८९ |
| | **एकूण खर्च** | **२९३३.७८** | **३२३५.८४** | **३०२.०६** | **३४७५.१२** |
| | करपूर्व नफा | ३४७.६३ | १९३.३९ | १५४.२४ | ४१४.४४ |
| | **एकुण** | **३२८१.४१** | **३४२९.२३** | | **३८८९.५६** |
| | | | | | |

(-) म्हणजे जास्तीचा झालेला खर्च

**सन २०१८-२०१९ सालात अंदाजपत्रका प्रमाणे कमी जास्त झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे व सन २०१९-२०२० वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.**

| अ. क्र. | उत्पन्नाचा प्रकार | सन २०१८-१९ | | | सन २०१९-२० |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्षात झालेले उत्पन्न | अंदाज पत्रकीय तरतुद | कमी जास्त | अंदाज पत्रकीय तरतुद |
| १ | व्याज मिळाले कर्जावरील | २३३९.६५ | २४३८.८२ | -९९.१७ | २७८१.१० |
| २ | व्याज मिळाले गुंतवणुकीवरील | ७८७.११ | ७५०.७४ | ३६.३७ | ८८६.४६ |
| ३ | कमीशन | ५२.१४ | ५०.४७ | १.६७ | ७५.०० |
| ४ | स्कुटनी फीस | ११.४८ | ७.७७ | ३.७१ | २०.०० |
| ५ | किरकोळ उत्पन्न | ५६.०३ | ४५.३२ | १०.७१ | ६०.०० |
| ६ | लॉकर भाडे | ९.६१ | १०.३० | -०.६९ | १२.०० |
| ७ | सरकारी रोखे व्यवहारावरील नफा | २२.४६ | १२५.०० | -१०२.५४ | ४०.०० |
| ८ | विमा उत्पन्न | ०.१२ | ०.५० | -०.३८ | १.५० |
| ९ | सिबील रिपोर्ट चार्जेस | २.८१ | ०.०० | २.८१ | ३.५० |
| १० | आय.टी.सर्व्हिस इतर व्यवसाय | ०.०० | ०.०० | ०.०० | १०.०० |
| | एकुण | ३२८१.४१ | ३४२९.२२ | -१४७.५१ | ३८८९.५६ |

(-) म्हणजे कमी झालेले उत्पन्न

# ‘ATM संबंधीत गुन्हे’

आजकाल आपल्यातील प्रत्येकजण सोयीसाठी ATM कार्ड आपल्याजवळ बाळगतो, पण या तंत्रज्ञानाच्या फायदयाप्रमाणेच त्याचे काही धोकेही आहेत त्यामुळे ATM वापरताना खालीलप्रमाणे काळजी घेणे गरजेचे आहे जेणेकरून ATM संबंधी गुन्ह्यांना आळा बसेल.

- फसव्या कॉल्सपासून सावध रहा, एटीएम कार्डविषयी कोणतीही माहिती अज्ञात व्यक्तीला देवू नका.
- तुमचा पिन नियमीतपणे बदला.
- तुमचा पिन कमांक लक्षात ठेवा,तो कुठेही लिहुन ठेवू नका, खास करून तो कार्डावर लिहू नका.
- तुमचे एटीएम कार्ड, पिन आणि इंटरनेट बँकींग यासंबंधीचा तपशील कोणालाही देवू नका.
- एटीएम बुथमध्ये कोणालाही आपल्याजवळ येवू देवू नका किंवा एटीएम व्यवहारासाठी कोणत्याही अनोळखी व्यक्तीची मदत मागू नका.
- एटीएम मशीनला कोणतेही अज्ञात उपकरण किंवा संशयास्पद मशीन लावले आहे असे वाटल्यास तुमचे कार्ड स्वाईप करू नका.
- तुमचा मोबाईल नंबर रजिस्टर करण्यासाठी तुमच्या शाखेला भेट दया, बॅंकेच्या व्यवहारासंबंधी एसएमएस अलर्ट मिळवा.



## ग्राहक सेवा-

बँकेने ग्राहकांसाठी एनी ब्रँच अकौंट ऑपरेशन, मनी ट्रान्सफर, डीडी, एनइएफटी, आरटीजीएस, एसएमएस अलर्ट, पंतप्रधान विमा योजना, आयएमपीयस अशाप्रकारच्या विविध सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. बँकेच्या बहुतांश शाखेच्या ठिकाणी एटीएम सुविधा सुरु केलेली आहे. अंबाजोगाई, माजलगाव, परळी, पालम, उदगीर, देगलूर, परतूर, धारुर, परभणी, नायगांव बा., औरंगाबाद,बीड, जालना, अहमदपूर या ठिकाणी बँकेची ए.टी.एम.सेवा सुरु आहे.

उपरोक्त सेवा देत असतांना बँक भारतीय रिझर्व बँकेच्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करत असते. जेणेकरुन ग्राहकांचे हित जपले जाईल. ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देण्यासाठी दीनदयाळ बँकेचा प्रत्येक कर्मचारी सर्वोतोपरी प्रयत्न करीत असतो. दीनदयाळ बँकेचा ग्राहक हेच बँकेचे दैवत आहे, याचे विस्मरण कधीही न होवू देता विनम्र व तत्पर सेवा देण्यासाठी बँक कायमच प्रयत्नशील असते.

ग्राहकांना देण्यात येणा-या सेवेसंदर्भात ग्राहक अत्यंत समाधानी असल्याचा प्रत्यय वेळोवेळी ग्राहकांकडून व्यक्त केला जातो. ग्राहक व दीनदयाळ बँक यांच्यामधील जिव्हाळयाचे नाते अधिकाधिक दृढ होण्यासाठी बँक नेहमीच प्रयत्नशीन राहील.

## मान्यवरांच्या भेटी –

मा.श्री गणेश हरिभाउ गाडगीळ (सांगली), मा.श्री यमाजी मालकर (पुणे), मा.श्री श्रीधर फडके (मुंबई), मा.श्री मकरंद मधुकर टिल्लु (पुणे), मा.श्री चैत्राम देवचंद पवार (धुळे), मा.श्री गणेश (भाउ) तोरसेकर (मुंबई), मा.डॉ.अशोक कुकडे (लातूर) या मान्यवरांनी बँकेस सदिच्छा भेट देवून बँकेच्या उत्तरोत्तर झालेल्या प्रगती आलेखाचे अभिनंदन करुन बँकेच्या स्वत:च्या मालकीच्या भव्य 'दीनदयाळ भवनाचे' भरभरुन कौतुक केले आहे. तसेच प.दीनदयालजींनी सुचविलेल्या मार्गावरुन बँकेच्या भावी यशस्वी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिलेल्या आहेत.

## सामाजिक प्रबोधन व उपक्रम

दीनदयाळ बँकेचे प्रतीवर्षीप्रमाणे अहवाल वर्षातही सामाजीक प्रबोधनासाठी योगदान आहे. या वर्षातील उपक्रमाचा अहवाल आपल्या माहितीस्तव सादर करित आहोत.

१. **युगपुरुष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला -२०१९**, दिनांक १० जानेवारी ते १२ जानेवारी २०१९ या कालावधीमध्ये संपन्न झाली. व्याख्यानमालेत खालील मान्यवरांनी बँकेच्या विनंतीस मान देवून उपस्थिती नोंदवून अंबाजोगाई व परिसरातील श्रोत्यांना त्यांच्या ज्ञानाचा लाभ दिला. श्रोत्यांनीही व्याख्यानमालेस उत्सफुर्त प्रतिसाद देवून व्याख्यानमालेचा कार्यक्रम सुसंपन्न केला.
   - **१० जानेवारी २०१९- मा.श्री मकरंद टिल्लू, हास्ययोग तज्ञ, पूणे - "हसण्यासाठी जगा, जगण्यासाठी हसा."**
   - **११ जानेवारी २०१९-** मा.श्री चैत्राम पवार, सामाजिक कार्यकर्ते, धुळे – "ग्रामीण विकासाचा भारतीय दृष्टीकोन."
   - **१२ जानेवारी २०१९** - मा.श्री गणेश (भाउ) तोरसेकर, संपादक, पुण्यनगरी, मुंबई– "प्राप्त राजकीय परिस्थिती व सामाजिक भान"

२. **जागतीक महिलादिनानिमित्त** मागील ३ वर्षापासुन बँकेमार्फत कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी जागतिक महिलादिनानिमित्त मोफत आरोग्य तपासणी केंद्रावर उपस्थिती नोंदविलेलया महिलांचे बँकेच्या वतिने पुष्प देवून स्वागत करण्यात आले व त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

३. **सैनिक हो तुमच्यासाठी-** भारत देशाचे रक्षण करीत असतांना शहीद झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी बँकेच्या ग्राहकांचा सहभाग व्हावा, यासाठी बँकेने प्रत्येक शाखेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधुन मदतनिधीचा बॉक्स शाखेत ठेवून बँकेच्या ग्राहकांना मदत करण्यासाठी आवाहन केलेले आहे. सदर बॉक्समध्ये जमा झालेली रक्कम भारत सरकारने सँडीकेट बँकेत उघडलेल्या आर्मी वेलफेअर फंड खात्यात वर्ग करण्यात येते.

४. पं.दीनदयाळजी उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त बँकेच्या सर्व शाखेच्या व मुख्य कार्यालयाच्या ठिकाणी एका मंदीराची स्वच्छता करून स्वच्छता अभियानात सर्व कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.
५. अहवाल वर्षात बँकेने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्नालय, अंबाजोगाई यांना २ हजार लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या देवून सहकार्य केले. विद्यार्थी, रुग्न व संस्थेच्या पणी साठपाची आडचण दूर केल्याबद्दल महाविद्यालयाने बँकेचे आभार मानले आहेत.
६. गामिण भागातील, बल्ड कॅन्सरने ग्रासलेला तरुण चि.भारत धिमधिमे याची बेताची आर्थिक परिस्थिती विचारात घेवून त्यास बँकेने आर्थिक मदत केली. सदर रुगनाचे नातेवाईक श्री सुनील धिमधिमे यांनी बँकेचे आभार मानले आहेत.
७. अहवाल वर्षात बँकेच्या शाखेंनी शाखेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधुन रक्तदान शिबीर, रोगनिदान शिबीर या सारख्या कार्यक्रमाचे आयोजन करुन कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केले आहेत. तसेच शिक्षक दिनाच्या निमित्ताने शाळेतील शिक्षकांना पत्यक्ष भेटून पुष्पगुच्छ देवून अभिनंदन करणे, मुकबधीर विद्यालयातील विद्यार्थी यांना चित्रकला वहया व रंगकाडयांची भेट देणे, या सारखे उपक्रम शाखेनी केले आहेत.

## शाखा मानांकन-

बँकेची व्यवसायवृध्दी, परिणामी बँकेचा आर्थिक विकास व सर्वांगीण विकास होण्यासाठी शाखास्तरावरील कामकाजास प्रगतीच्या दृष्टीकोनातून स्पर्धात्मक स्वरूप यावे. तसेच उत्तम प्रगती केलेल्या शाखेंना प्रोत्साहन मिळावे व इतर शाखांनाही प्रेरणा मिळावी, यासाठी बँकेने अंतर्गत आर्थिक निकष निश्चित करून दिनांक ०१.०४.२०१७ ते ३१.०३.२०१८ या आर्थिक वर्षातील बँकेच्या सर्व शाखेंच्या निकषाधारीत विश्लेषनानंतर शाखेंचे मुल्यांकन करुन प्राप्त गुणांच्या अधारे बँकेच्या शाखेंना प्रथम, व्दितिय, तृतीय व प्रोत्साहनपर चतुर्थ श्रेणी निश्चित करण्यात आली होती. प्रथम मानांकीत शाखा- नांयगांव बाजार, व्दितीय- धारूर, तृतिय - नांदेड व प्रोत्साहनपर शाखा- देगलूर यांना मागील वर्षीच्या सर्वसाधारण सभेत पुरस्कारीत करण्यात आलेले होते. कार्यरत शाखाधिकारी यांचा सत्कार करून त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आलेले होते.

## अंतर्गत समावर्ती लेखापरिक्षण-

मा.वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०७.२०१८ ठराव क्रं.८ अन्वयेच्या मान्यतेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अंतर्गत समावर्ती लेखापरिक्षणासाठी १.व्ही.एन.वंगे ॲण्ड असोसिएट्स २.एस.आर.गुंडलवार ॲण्ड कंपनी ३. आर.एन.लातुरकर ॲण्ड कंपनी ४.पी.सदाशीवराव पाटील ॲण्ड कंपनी ५.प्रसाद हराळे ॲण्ड असोसिएट्स यांची नेमणूक करण्यात आलेली होती. या सर्व लेखापरिक्षकांनी मुख्य कार्यालय व सर्व शाखांची मासिक तपासणी करून सनदी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण केले आहे. त्यांच्या वेळोवेळीच्या मार्गदर्शनाचा बँकेच्या कामकाजासाठी उत्तम फायदा झालेला आहे. मुख्यालय तथा सर्व शाखेंच्या दैनंदिन बँकींग कामकाजात अपेक्षित सुधारणा झालेली आहे. बँक त्यांची अत्यंत आभारी आहे.

## वैधानिक लेखापरिक्षण-

मा.वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २९.०७.२०१८ ठराव क्रं.७ अन्वयेच्या मान्यतेनुसार सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरिक्षणासाठी मे.व्ही.बी.वालवडकर ॲण्ड कं., चार्टर्ड अकाउंटंट यांची नेमणूक करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ व ८१ (९७ व्या घटना दुरूस्ती अन्वये सुधारित) व १९६१ चे नियम ६९ अन्वये श्री.व्ही.बी.वालवडकर ॲण्ड कं., यांनी आर्थिक वर्ष २०१८-१९ चे वैधानिक लेखापरिक्षण पूर्ण केले आहे. बँकेच्या कामकाजाबाबत सुक्ष्म तपासणी करून बँकेस मोलाचे मार्गदर्शन केले आहे. बँकींग कामकाजावर समाधान व्यक्त करुन बँकेस सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग 'अ' प्रदान केला आहे. मे.व्ही.बी.वालवडकर ॲण्ड कं., यांनी बँकेस केलेल्या मार्गदर्शनाबद्दल बँक त्यांची अत्यंत आभारी आहे.

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात थकबाकी कर्जखात्यांस एकरकमी भरणा करुन उर्वरित रकमेस दंडव्याजात व नोटीस खर्चास सुट दिलेल्या प्रकरणांना मान्यता देणे.**

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात एनपीए मधील खाती कमी होऊन वसुली वाढावी यादृष्टीकोनातुन बँकेने थकबाकीतील कर्जखात्यांना एकरकमी भरणा करुन उर्वरित रकमेस व्याज, दंडव्याजात व नोटीस खर्चास महाराष्ट्र शासनाचे संबंधीत निर्देशाअधिन सुट देण्यात आलेली आहे, अशा प्रकरणांना वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव सविनय सादर. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| **एकुण कर्जप्रकरणे** | **व्याजात तथा दंड व्याजात व नावे पडलेल्या खर्चात सूट दिलेली रक्कम** | **सुट देवून निव्वळ वसुल झालेली रक्कम** |
|---|---|---|
| ३९ | ३५,९६,६५६/- | २,६६,६५,७३१/- |

**आभार व ऋणनिर्देश –**

■भारतीय रिझर्व बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई व विभागीय कार्यालय,नागपूर ■महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि.मुंबई, ■ बीड/परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक लि. ■स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ■आय.सी.आय.सी.आय.बँक ■एच.डी.एफ.सी.बँक ■ॲक्सीस बँक,नांदेड ■मा.सहकार आयुक्त तथा निबंधक,सहकारी संस्था, म.रा.पुणे ■मा.विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,लातूर ■ मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,बीड,नांदेड,लातूर,परभणी, जालना ■मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ■व्ही.एन.वंगे ॲण्ड असोसिएट्स ■२.एस.आर.गुंडलवार ॲण्ड कंपनी ■आर.एन.लातुरकर ॲण्ड कंपनी ■पी.सदाशीवराव पाटील ॲण्ड कंपनी ■प्रसाद हराळे ॲण्ड असोसिएट्स ■मे.व्हि.बी.वालवडकर ॲण्ड कं.,वैधानिक लेखा परिक्षक ■सहकार भारती,महाराष्ट्र प्रांत,मुंबई ■महाराष्ट्र राज्य सह.बँक्स असो.लि.मुंबई ■महाराष्ट्र अर्बन को.ऑप.बँक्स फेडरेशन ■मराठवाडा अर्बन को.ऑप.बँक्स असो.लि.औरंगाबाद ■नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को.ऑप.बँक्स ॲण्ड क्रेडीट सोसायटीज लि.

## संदेश 1 : पॉंझी योजना व घोटाळ्यांपासून सावध रहा

